ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-II | ISSUE-III | March | 2015

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# गांधीजीचे आर्थिक विचार : एक अभ्यास

**डॉ. कदम कुलदीप शंकरराव**
शरदचंद्र महाविद्यालय,
नायगांव (बा),
मो.नं. ९७६७२१३०७४
इे-मेल :kkldeep००७@gmail.com

भारतीय स्वातंत्र्य लढयाला अहिंसेच्या मार्गाने नेणारे महात्मा गांधी हे थोर विचारवंत होते. सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक विचारांबरोबरच त्यांनी आर्थिक विचारांचीही मांडणी केली आहे. त्यांचे काही आर्थिक विचार हे आजच्या जागतिकीकरणाच्या युगात भारतीय अर्थव्यवस्थेचा आर्थिक विकास साध्य करताना तंतोतंर लागू पडत नसेले तरी काही आर्थिक विचार निश्चितच पथदर्शी ठरतात. अहिंसा आणि समतेचा आधार दिला तर अर्थशास्त्र हे समाजाला अधिक उपयुक्त ठरते. अर्थशास्त्राला गांधीजींनी नैतिक व अध्यात्मिकतेचीही जोड दिल्याचे दिसते.

गांधीजी थोर विचारवंत होते.त्यांच्या विचारावर गीता, उपनिषदे या महान ग्रंथाचा तसेच संत कबीर, मीराबाई, गुरुनानक या संताचा विचारांचा आणि थोर, रस्किन टॉलस्टॉय या विचारवंताचा प्रभाव होता.असहकार,अहिंसा,सत्य या तत्वांच्या आधारावर आयुश्यामध्ये त्यांनी जे काही आर्थिक विचार मांडले ते भारतीयासाठी अतिशय मौल्यवान आहे.गांधीजी अर्थशास्त्रज्ञ नव्हते किंवा आर्थिक विचार प्रकट करणारा स्वातंत्र ग्रंथही त्यांनी लिहिलेला नाही. त्यांनी राजकारण,धर्म आणि जीवनविषयक जे तत्वज्ञान मांडले त्यातच त्यांचे आर्थिक विचार विखुरलेले आहेत. त्यांनी मांडलेल्या आर्थिक विचारापैकी काही विचार आजच्या जागतीकरणाच्या प्रक्रियेत महत्वाचे आहेत. त्यामध्ये विश्वस्ताची संकल्पना,साधी राहणी व उच्च विचारसरणी,उत्पादक रोजगार आणि आर्थिक वृध्दिचे प्रतिमान याबाबतच्या विचारांचा समावेश करावा लागतो.

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा त्या देशातील मनुष्य शक्तीवर आधारीत असतो.जी शारिरीक आणि मानसिक स्वरूपात शक्तीशाली असते. ज्या देशातील मानवशक्ती जेवढी अधिक, कुशल योग्य आणि परिश्रमी असेल तेवढीच त्या देशाची प्रगती अधिक तीव्रतेने होते. गांधीचे आर्थिक विचार सत्य., अहिंसा, श्रमाची महानता आणि सरलता या चार मुळ सिध्दांतावर आधारीत होते. गांधीचे सामाजिक आणि आर्थिक विचार मानविय स्वभाव आणि या प्रकृतीमध्ये त्याच्या अस्तित्व स्वभावाच्या वास्तविक मुल्यांकनावर आधारीत आहे. त्यांना माहीत होते की,प्रगतीशील संघठन आणि प्रगत तंत्राची यशस्वीता अशा मौलीक तथ्यांना बदलू शकत नाही. कारण मनुष्य मोठया आकराचा प्राणी नसून अधिकत्त्म सामान्य योग्यतेवाला प्राणी आहे.

## आर्थिक विकासासंबंधी गांधीचे विचार :-

गांधीजींनी आर्थिक विकासाचे उद्देश प्राप्तिकरीता आपल्या स्वरंचनेमध्ये आणि भाषणामध्ये पुढीलप्रमाणे आपले विचार मांडले आहेत.-

**१) ग्रामीण अर्थव्यवस्थेला प्राथमिकता: -** गांधीनी भारतातील गरीबीला लक्षात ठेवून लघू व कुटीर उद्योगांना महत्त्व दिले होते. वर्तमानकाळात देशामध्ये ग्रामीण क्षेत्रात सरकार आज लघु व कुटीवर उद्योगांच्या विकासासाठी शिक्षित बेरोजगार तरूण - तरुणीना कर्ज देत आहे. तसेच रोजगारासंबंधी प्रशिक्षण सुध्दा दिले जात आहे. ज्यामध्ये ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही क्षेत्रातील बेरोजगारांना रोजगार प्राप्त होतो आणि देशाचा आर्थिक विकास घडून येत आहे.

**२) आर्थिक आत्मनिर्भरता :-** गांधीजी आर्थिक आत्मनिर्भरता आणि स्वालंबनाचे कठोर समर्थक होते. आर्थिक आत्मनिर्भरता आणि स्वालंबन याकरीता गांधीजीनी अनेक कार्यांचा उल्लेख केला आहे. जसे- चर्खा चालविणे, चक्की चालविणे,धागा काढणे, कपडा तयार करणे आणि लहान - मोठे काम करणे. ते या विविध प्रयोगातून लोकांना जाणिव करून देत होते की, संपूर्ण देश याप्रकारे कार्याचे संपादन स्वत: केले तर आर्थिक अडचणीतून मुक्त होऊ शकते.

आज भारतात गांधीच्या विचारांना अनुसरुन आर्थिक विकासासाकरीता स्वालंबनाच्या धोरणांचा अवलंब करतांना दिसून येते. देशात अशा अनेक उद्योग - धंद्यांची स्थापना केली जाते, ज्याकरीता परकीय आश्रयावर राहावे लागत असे. आज देशात आधारभूत उद्योगांसोबतच यंत्रसामग्री,शस्त्र निर्माण उद्योग आणि अनेक परिवहनाच्या साधनांचा विकास होत आहे. त्यामुळे  दुसऱ्या देशांवरील निर्भरता कमी - कमी होत आहे. ज्यावेळी गांधी आर्थिक आत्मनिर्भरतेचे विचार व्यक्त करीत होते. त्यावेळी इतर देश व्यापार व्यवसायाच्या माध्यमातून भारताचे शोषण करीत होते. गांधीच्या या महत्त्वपूर्ण दिशा मिळाली. आज देशात अनेक वस्तुंचे प्रचंड प्रमाणात उत्पादन होत आहे. ज्यामुळे देशाची गरज तर पूर्ण होतच आहे, परंतू विदेशात सुध्दा वस्तुंची निर्यात होऊन विदेशी उत्पन्न प्राप्त होत आहे

**३) औद्योगिकरण : -** गांधी देशातील औद्योगिकरणाचे कट्टर विरोधी होते. त्यांचा असा विश्वास होता की, मोठ्या प्रमाणावरील उत्पादनापासूनच सामाजिक आणि आर्थिक उत्पादन झाले होते. मानवाच्या शरीर आणि चारित्र्याच्या संपूर्ण विकासासाकरीता व्यक्तिगत शक्तीच्या संचालनाची पूर्ण स्वतंत्रता असली पाहिजे. गांधीजी विकेंद्रित अर्थव्यवस्थेचे समर्थक होते. एक अशी अर्थव्यवस्था ज्यामध्ये मजुर स्वत: स्वत:चा मालक असेल. गांधी यंत्रसामग्रीच्या उपयोगाचे पूर्ण विरोधी नव्हते. त्यांनी एकावेळी स्वत: म्हटले होते की, ते यंत्राच्या उपयोगाचे विरोधी नाही. कारण त्यांना माहीत होते की, मानवाचे शरीर आणि चरखा सुध्दा यंत्र आहे आणि या दृष्टीकोणनातून दात खोरण्यासाठी वापरण्यात येणारी काठी सुध्दा यंत्र आहे. गांधी फक्त अशा यंत्र उपयोगाच्या विरोधात होते ज्यामुळे मानवी परिश्रमाची गरज पडत नव्हती.कारण देशातील लोकांना बेरोजगार राहून भुकेमुळे हालअपेष्टा भोगाव्या लागतील.गांधीच्या मताप्रमाणे मै समय और परिश्रम की बचत करना चाहता हू., किन्तू मानव जाति के बहूत थोडे भाव के लिए नही सभी के लिए आज मशीन केवल थोडे से ही व्यक्तियाँ की पीठ पर चढने की सहायता करीत है.

**४) उद्योगांचे विकेंद्रीकरण : -** मोठया यंत्रप्रधान उद्योगांऐवजी,उद्योगांचे विकेंद्रीकरण करावे. लहान-लहान उद्योगांच्या विकासाने दारिद्रय व बेकारीची समस्या दुर होऊ शकेल. यामुळे संपत्तीच्या केंद्रीकरणालाही आळा बसेल. संपूर्ण भारताच्या विकासासाठी उद्योगांचे विकेंद्रीकरण होणे गरजेचे आहे. आजही दारिद्रय व बेकारीची समस्या निवारण्यास त्याचा निश्चितच उपयोग आहे.

**५) श्रमिकांचे कल्याण :-** गांधीजींनी शारिरीक श्रमाला अधिक महत्व दिले. कारखान्यात कामगारांवर अन्याय होतो असे त्यांचे मत होते. बालकामगार ही लाजीरवाणी गोष्ट आहे. कामगांराना योग्य वेतन व मानसन्मान मिळावा यासाठी हरिजन अंकातून त्यांनी सतत

लेखन केले. श्रमिक व भांडवलदार यांच्यात सहकारी वाढवावा,यंत्रासाठी माणूस नसून माणसाच्या सुखासाठी यंत्र आहे यांचे समाजाने भान ठेवावे. कामगारांचा आर्थिक विकासाबरोबर शारिरीक, बौध्दिक,नौतिक,राजकिय, सांस्कृतिक,शैक्षणिक असा सर्वांगिण विकास संघटनांनी घडवून आणला पाहिजे.

**६) लोकसंख्ये नियंत्रण संबंधी विचार :-** लोकसंख्या मर्यादित करणे आवश्यक आहे,परंतू लोकसंख्या नियंत्रणाकरिता त्यांना कृत्रिम साधंनाचा वापर मान्य नव्हता. संयम व ब्रम्हचर्य पाळून लोकसंख्याला आवर घातला पाहिजे असे त्यांचे मत होते.

**७) कृषीसंबंधी विचार :-** शेती हा भारताचा आत्मा आहे असे गांधीजी म्हणत, शेतीचा विकास झाल्याशिवाय भारताचा आर्थिक विकास होऊ शकत नाही असेते प्रतिपादीत करत. भारतातील शेतीसंबंधी जमिनदारी पध्दतीचे ते विरोधक होते. जमीन ही निसर्गाने दिलेली विनामुल्य देणगी आहे. त्यामुळे जमिनीवर व्यक्तींचा हक्क नसून संपूर्ण समाजाचा हक्क आहे असे त्यांचे मत होते.

गांधीजींच्या आर्थिक विचारामधील साधी राहणी व किमान गरजा हे आर्थिक विकासाचे महत्वाचे सुत्र आहेत. भारतातील सर्व समाजाच्या लोकांनी महात्मा गांधीजीच्या तत्वाचा स्विकार करून ते अंमलात आणल्यास देशाची आर्थिक समस्येची सोडवणूक होईल. भारतीय समाज परिवर्तन घडवून आणावयाचे असल्यास अंहिसा,सत्य यांचा मार्ग गांधीजीनी सांगीतला.विश्वस्त संकल्पनेचा स्विकार करून हिंसक मार्गचा स्वीकार न करता भांडवलशाही सुधारणेबाबत मार्गाच्या सूचनाही केल्या आहेत. तसेच भारतात ग्रामीण भागात लघू उद्योग धंद्यावर अधिकाधिक भर दिल्यास देशाच्या विकासाचा कायपालट होईल. आज समाजाला योग्य मार्गाने विकसीत करण्यासाठी हेच विचार आधारभूत वाटतात.

**संदर्भ ग्रंथः-**

१. गांधी का आर्थिक चिंतन - डॉ. ए.डी.एन.वाजपेयी.
२. भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण - डॉ.भा.ल.भोळे.
३. गांधीजी - पु.ल.देशपांडे.
४. गांधी विचार - ठाकुरदास बंग
५. गांधीजी आणि सामाजिक समता - जाधव श्रीराम.